**औसा, येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, जिल्हा लातूर यांच्या न्यायालयात.**
**(पिठासीन अधिकारी श्री. एस. एल. फुले.)**

**दोषारोप**

(फौ.प्र.सं., १९७३ चे कलम २११,२१२, २१३)

नियमीत फौजदारी खटला क्रमांक **२१५/२०२१** **नि.क्र.१४/क.**

मी, **सुभाष लक्ष्मण फुले**, प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, औसा, जिल्हा लातूर तुमच्यावर,

अशोक सोपान पांढरे.
वय – ६५ वर्षे, व्यवसाय– शेती,
राहणार खुंटेगाव, तालूका औसा, जिल्हा लातूर.

**दोषारोप ठेवतो ते खालीलप्रमाणेः–**

**पहिले असे की,** तुम्ही दिनांक **१५.०४.२०२१** रोजी **१८.२०** वाजताच्या सुमारास, या न्यायालयाचे स्थळसीमेत, खुंटेगाव शिवारातील तुमचे शेत सर्वे क्रमांक १५४ मधील पऱ्याचे शेडचे बाजूला उंकड्यात तुमच्या ताब्यात देशी दारु टँगो पंच कंपनीचे कागदी लेबल असलेले १८० मि. ली. च्या **१७ बाटल्या** एकूण किंमत अंदाजे रक्कम रुपये **८८४/–** विना परवाना, विना अनुज्ञप्ती बाळगली व त्याद्वारे ***महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई)*** अन्वये दंडनीय गुन्हा केला.

**दुसरे असे की,** तुम्ही वरील तारीख, वेळ व ठिकाणी तुमच्या ताब्यात देशी दारु टँगो पंच कंपनीचे कागदी लेबल असलेले १८० मि. ली. च्या **१७ बाटल्या** वाहतूकीच्या हेतुने बाळगल्या व त्याद्वारे ***महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (अ)*** अन्वये दंडनीय गुन्हा केला.

आणि मी याद्वारे तुमच्यावर वरील गुन्हयांकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

(आरोपीला दोषारोप वाचून व समजावून सांगितला त्यांनी अपराध केल्याचे नाकारले व संपरीक्षा घेण्याची मागणी केली.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Subhash Laxman Phule
Date: 2024.03.26 14:03:49 +0530

**(श्री. एस. एल. फुले)**

**दिनांक २६.०३.२०२४.** **प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, औसा,**
**ठिकाण: औसा.** **जिल्हा लातूर.**